**प्रेसनोट** दि. ०१/०६/२०२४

**पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ (म्हाडा) कार्यालयातील प्रोजेक्ट मॅनेजरवर (कंत्राटी खाजगी इसम) लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर. गु.र.नं. १५१/२०२४. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७, ७ अ. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ६० वर्षे |
| आरोपीचे नाव व पत्ता | श्री. अभिजीत व्यंकटराव जिचकार, वय ३४ वर्ष, पद – प्रोजेक्ट मॅनेजर (कंत्राटी खाजगी इसम) नेमणुक - म्हाडा कार्यालय, पुणे. रा. वाकड, पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २,००,०००/- रुपये |
| पडताळणीअंती वाढीव लाच मागणी रक्कम | २,७०,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | २,७०,०००/- रुपये (दोन लाख सत्तर हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | दि. २१/५/२०२४, दि. २४/५/२०२४, दि. २७/५/२०२४, दि. २९/५/२०२४ व दि.३१/५/२०२४ |
| सापळा दिनांक | दि. ३१/०५/२०२४ रोजी सायंकाळी |

ठिकाण :- दिनांक ३१/०५/२०२४ रोजी परमार चेंबर येथील स्टेटस फॅमिली रेस्टॉरंट अ‍ॅन्ड बार मध्ये, साधु वासवानी चौक, पुणे..

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांना म्हाडा तर्फे लॉटरी पद्धतीने घर मिळाले होते. सदर घराच्या जाहिरातीच्या वेळेस अधिकची रक्कम लागेल याबाबत नमूद नसल्याने तक्रारदार यांना सदर सदनिकेचा वाढीव हप्ता भरता आला नाही. त्यासाठी तक्रारदार यांनी सदर सदनिकेचे फेरवितरन होऊन आरटीजीएस चलन मिळण्यासाठी पुणे गृहनिर्माण क्षेत्र विकास मंडळ (म्हाडा) पुणे येथे सविस्तर अर्ज दिला होता व तक्रारदार हे त्याबाबत पाठपुरावा करत होते. तक्रारदार हे म्हाडा, पुणे कार्यालयातील मुख्याधिकारी व कंत्राटी खाजगी इसम अभिजीत जिचकार यांना भेटले असता, त्यांनी तकारदार यांचेकडे सदनिकेचे फेर वितरण होवून आरटीजीएस चलन देण्यासाठी दोन लाख रुपयांची लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता, आरोपी कंत्राटी खाजगी इसम अभिजीत जिचकार यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांची सदनिका पुन्हा वितरित करुन आरटीजीएस चलन काढून देण्यासाठी लोकसेवक मुख्याधिकारी, म्हाडा, पुणे यांच्याकरीता रु. २,२०,०००/- ची व स्वतःकरीता रु. ५०,०००/- ची अशी पंचासमक्ष वाढीव एकुण २,७०,०००/- रुपये पंचासमक्ष लाचेची मागणी केली. कंत्राटी खाजगी इसम अभिजीत जिचकार यांनी तक्रारदार यांचेकडून सदरची २,७०,०००/- रुपये लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्यावर कंत्राटी खाजगी इसम अभिजीत जिचकार यांना अटक करण्यात आली असून, त्यांचेविरुद्ध बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक विरनाथ माने तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२) अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३) व्हॉट्स-अ‍ॅप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४) व्हॉट्स-अ‍ॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७) ऑनलाईन अ‍ॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(नितीन विजय जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner